बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक १९ | बुधवार,दि.१६ एप्रिल २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## जिल्हा परिषदेत जीएसटी कायद्याला हरताळ

### ग्रामपंचायतींना दिल्या जाणाऱ्या विकास निधीला २ टक्क्यांची अवैध कात्री



**गोंदिया**– गोंदिया जिल्हा परिषद तशीही नेहमी आपल्या अनियमित कारभारासाठी कायम चर्चेत असते. यातच या स्थानिक स्वराज्य संस्थेने आणखी एक भर घातली ती वस्तू आणि सेवा कर कायदा अर्थात जीएसटी कायद्यातील तरतूदींचे उल्लंघनाची. या संदर्भात गोंदियातील एका करपालन सेवा पुरविणाऱ्या खासगी कंपनीने जिल्हा परिषदेच्या या कारभारावर पत्र देऊन गंभीर ताशेरे ओढल्याचे समोर आले आहे. परिणामी, गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये कायद्याने कामे नक्की होतात काय? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

सविस्तर असे की, गोंदिया जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील विकास हा त्या त्या गावच्या स्थानिक ग्रामपंचायतीमार्फत केला जातो. या सर्व कामांना मंजूरी प्रदान करणे,मंजूर कामांच्या प्रगती आणि गुणवत्तेवर नजर ठेवणे तसेच या कामांसाठी लागणारा निधी विविध हेड्स खाली मंजूर करणे, आदी कामे जिल्हा परिषदेमार्फत करणे अपेक्षित असते. त्याप्रमाणे ती कामे सुद्धा करण्यात येतात. या कामावर खर्च होणाऱ्या निधीवर काही ठराविक वस्तू आणि सेवा कायद्यांतर्गत केंद्र व राज्य सरकारद्वारे कर आकारला जातो. तो कर हा प्रत्यक्ष कामे करणाऱ्या संस्थांमार्फत सरकारी खजिन्यात दाखल करणे अपेक्षित असते.

त्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने जीएसटी कायद्यांतर्गत नोंदणी सुद्धा केलेली असल्याचे सांगण्यात येत आहे. याचा सरळ सरळ अर्थ जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतींना दिल्या जाणाऱ्या विकास निधीवर लागणारा जीएसटी हा संबंधित ग्रामपंचायतींनी सरकारी खजिन्यात दाखल करणे अनिवार्य आहे.

असे असले तरी गोंदिया जिल्हा परिषद ही ग्रामंचायतीच्या कामाच्या देयकातून २ टक्के जीएसटी टीडीएस कपात करून उरलेला विकास निधी ग्रामपंचायतींना हस्तांतरीत करीत असल्याचे समोर आले आहे.

या संदर्भात सीजीएसटी कायदा २०१७ च्या कलम ५१ मध्ये कपातीसंबंधी स्पष्ट तरतूदीं दिल्या आहेत. त्याप्रमाणे दि. १४ सप्टेंबर २०१८ च्या परिपत्रक क्र. ६५/३९/२०१८ नुसार जर दोन्ही पक्ष जीएसटी कपातदार असतील तर टीडीएस लागू होत नसल्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

या प्रकरणात जीएसटी कायद्यातील कलम ५१ नुसार जर एखाद्या पुरवठाधारकाला देय रक्कम दिली गेली असेल आणि तो जीएसटी कपातदार नसेल अश्याच प्रकरणात जिल्हा परिषद टीडीएस कपात करू शकते. परंतू, जिल्ह्यातील जवळपास सर्वच ग्रामपंचायची या जीएसटी कायदयाखाली कर कपातीसाठी नोंदणीकृत असल्याचे सांगण्यात येत आहे. परिणामी, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायती या दोन्ही संस्था नोंदणीकृत असल्याने टीडीएस कपात करण्याची जिल्हा परिषदेला आवश्यकता नाही.

याउलट ग्रामपंचायतींना त्यांचे स्वतःचे जीएसटी टीडीएस अनुपालन करणे कायद्याने बंधनकारक आहे. परिणामी, जिल्हापरिषदेने आधीच २ टक्के निधी कपात केल्याने जे मुळात कायदेशीररित्या अवैध आहे, ग्रामपंचायतीच्या निधीवर ताण पडतो. यामुळे त्यांचे आर्थिक व्यवहार अडचणीत येतात. परिणामी, जिल्हापरिषदेकडून कपात केली गेलेली २ टक्के निधी हा संबंधीत ग्राम पंचायतीच्या खात्यावर वर्ग करण्याची मागणी सर्वच ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदेककडे केली आहे.

## अमरावतीचे सुपुत्र भूषण गवई भारताचे नवे सरन्यायाधीश



**अमरावती**:- अमरावतीचे सुपूत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई १४ मे रोजी भारताच्या सरन्यायाधीशपदाची शपथ घेणार आहेत. भूषण गवई हे भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून काम पाहणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना राष्ट्रपती भवनात भारताच्या सरन्यायाधीशपदाची शपथ देतील.

मिळालेल्या माहितीनुसार, भारताचे विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना लवकरच निवृत्त होणार आहेत. त्यावेळी नवे सरन्यायाधीश कोण असतील याबाबत बरीच उत्सुकता होती. ज्यावर आता निर्णय घेण्यात आला आहे. भारताच्या नव्या सरन्यायाधीशपदावर भूषण गवई असतील. भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात अनेक चांगल्या गोष्टी सुरू केल्या आहेत. त्यांनी जनहित याचिकेच्या सुनावणीसाठी आठवड्यातील एक दिवस निश्चित केला आहे. सर्वसामान्यांसाठीही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण आदेश पारित केले. यासोबतच उत्तर प्रदेशातील आरोपींच्या घरांवर बुलढोझर चालविण्याच्या कारवाईवरुन त्यांनी सरकारला फटकारलं होतं. न्यायमूर्ती भूषण गवई यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात २४ नोव्हेंबर १९६० मध्ये झाला. मुंबईत विधीचं शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी १९८५ मध्ये वकिलीची सुरुवात केली. करिअरच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी मुंबई आणि अमरावतीमध्ये काम केलं.

त्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राजा ए. भोसले यांच्यासोबत काम केलं. ते मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीशही बनले. काही काळानंतर त्यांची पदोन्नती झाली. ते २४ मे २०१९ ला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले. आता १४ मे २०२५ रोजी ते सरन्यायाशीधपदाची शपथ घेतली. ते सहा महिन्यांसाठी या पदावर असतील, त्यानंतर २३ नोव्हेंबर २०२५ ला निवृत्त होतील. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात अनेक गोष्टी सुरू केल्या. त्यांनी जनहित याचिकेसाठी आठवड्याचा एक दिवस निश्चित केला. त्यांनी उत्तर प्रदेश सरकारला बुलढोझर कारवाईवरुन फटकारलं. सर्वोच्च न्यायालयात वकील न्यायमूर्तींसमोर मोठ्या आवाजात बोलत होते. त्यांनी यावर आक्षेप नोंदवला आणि वकिलांना कडक शब्दात फटकारलं. ते नागपूर बार असोसिएशनचे तिसरे सदस्य आहेत, जे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बनले. यापूर्वी न्यायमूर्ती मोहम्मद हिदायतुल्ला आणि न्यायमूर्ती शरद अरविंद बोबडे सरन्यायाधीश झाले होते.

## ६७२ गावांमध्ये पाणीटंचाईची शक्यता

## सरपंच संघटना करणार आंदोलन



**गोंदिया** – जिल्ह्यातील सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, आमगात आणि सालेकसा तालुक्यातील काही गावांमध्ये पाणीटंचाईची तीव्र समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांची ओरड वाढली होती. मात्र जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने पाणीटंचाईचा आराखडा तयार न करता उलट पाणीटंचाई कुठे असा सवाल उपस्थित केला होता. लोकमतने हा विषय लावून धरल्यानंतर या विभागाने दुसऱ्या टप्प्यातील पाणीटंचाईचा आराखडा तयार केला असून त्यात तब्बल ६७२ गावांमध्ये पुढील दोन महिन्यात

### दोन–तीन वर्षांपासून पाइप–लाइनचे काम अर्धवट

**गेल्या दोन–तीन वर्षांपासून अनेक गावात पाइपलाइन अर्धवट टाकली आहे. काही ठिकाणी टाकी तयार झाली तर विहीर तयार झाली नाही, विहीर झाली तर नळ नाही आणि नळ लागले तर विहिरींचा पत्ता नाही. काही योजना या केवळ मंजूर झाल्या त्यानंतर त्यांची फाईल पुढे सरकलीच नाही. एकंदरीत निधी व नियोजनाच्या अभावामुळे कोट्यवधींच्या पाणीपुरवठा योजनांची कामे ठप्प असल्याने गावकऱ्यांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.**

पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविली आहे. उन्हाळ्यात भूजल पातळी खालावत असल्याने काही भागात पाणीटंचाईची समस्या निर्माण होते. हीच बाब लक्षात घेऊन त्यावर उपाय योजनांसाठी प्रशासनाकडून तीन टप्प्यात पाणीटंचाईचा आराखडा तयार केला जातो. जानेवारी अथवा फेब्रुवारी महिन्यात पहिल्या टप्प्यातील पाणीटंचाईचा आराखडा तयार होणे अपेक्षित होते. मात्र यंदा एप्रिल महिन्याला सुरुवात झाली तरी जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने पाणीटंचाईचा आराखडा तयार केला नव्हता. तर दुसरीकडे गावागावात पाणीटंचाईची बाँब सुरु झाली होती. लोकमतने हा मुद्दा लावून धरल्यानंतर या विभागाने पाणीटंचाईचा दुसऱ्या टप्प्यातील आराखडा तयार केला असून त्यात ६७२ गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविली आहे. विशेष म्हणजे यंदा तापमानात वाढ होत असून भूजल पातळीत सुध्दा झपाट्याने घट होत आहे.

त्यामुळे मे आणि जून महिन्यात पाणीटंचाईच्या समस्येत अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. तर चार तालुक्यात पाणीटंचाईची समस्या अधिक बिकट होण्याची शक्यता असून त्यासाठी वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.

### जलजीवनच्या कामांना ब्रेक, सरपंच करणार शोले स्टाईल आंदोलन !

केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन योजना निधीअभावी अपयशी ठरू लागली आहे. जिल्ह्यातील अनेक योजना निधी न मिळाल्याने कंत्राटदारांनी अर्धवट सोडून दिल्याने ग्राम पंचायतींची डोकेदुखी वाढली आहे. उन्हाळा लागताच गावागावांत पाणी पेटू लागले आहे. रखडलेली जलजीवन मिशनची कामे त्वरित सुरू करा अन्यथा जिल्ह्यातील सरपंच एकाचवेळी वेगवेगळ्या ठिकाणी गावागावांत पाणी टाकीवर चढून मशोले स्टाईलफ ने आंदोलन करण्याचा इशारा गोंदिया जिल्हा सरपंच संघटनेने दिला आहे.

पाणीटंचाई आराखडा टप्पा २ अंतर्गत ६७२ गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी ९ कोटी ७८ लाख रुपयांच्या पाणीटंचाई आराखड्याला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळाली आहे. या अंतर्गत आता उपाययोजना करण्यात येतील.

**– सुमीत बेलपत्रे, कार्यकारी अभियंता जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

### ९ कोटी ७८ लाख रुपये उपाययोजनांसाठी मंजूर

पाणीटंचाई आराखडा टप्पा २ अंतर्गत जिल्ह्यातील ६७२ गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना करण्यासाठी ९ कोटी ७८ लाख रुपयांच्या खर्चाच्या आराखड्याला मंजूरी दिली आहे. या अंतर्गत आता कामाला सुरुवात केली जाणार असल्याचे जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## शिक्षकांना निरक्षरांच्या सर्वेक्षणाचे आणखी एक शाळाबाह्य काम..!



**गोंदिया** : नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत निरक्षरांचे सर्वेक्षण करण्यासाठी शिक्षण संचालकांनी (योजना) नुकतीच सूचना जारी केली आहे.परंतु शिक्षकांकडे अनेक प्रकारची कामे असताना शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबरोबर आता निरक्षरांचे सर्वेक्षण करायचे कसे,असा प्रश्न शिक्षक संघटनांनी शिक्षणमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात उपस्थित केला आहे.

केंद्र शासनाने निरक्षरांना साक्षर करण्यासाठी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम उपक्रम सुरू केला आहे.त्यासाठी निरक्षरांचे सर्वेक्षण केले जाते आणि त्यानंतर त्यांना साक्षर केले जाते. याबाबत ९ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्राच्या शिक्षण संचालनालयाने (योजना) शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाबरोबरच आता निरक्षरांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश काढले आहेत. शिक्षकांना निरक्षर व्यक्तींची नोंदणी उल्लास मोबाइल ॲपवर करायची आहे. शिवाय, अध्यापनही करायचे आहे. राज्यातील सर्व शाळांनी दाखलपात्र विद्यार्थी सर्वेक्षण आणि शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण याबरोबरच निरक्षरांचे सर्वेक्षण करावे, असे सूचनेत म्हटले आहे.

### अशैक्षणिक कामे

अशैक्षणिक कामे कोणती याची माहिती २३ ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णयात दिली आहे. तरीही शिक्षकांना अध्यापनाऐवजी इतर कामात गुंतवले जाते, असे पुरोगामी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरीराम येरणे यांनी म्हटले आहे.

### कोणतेही वेगळे काम दिलेले नाही : शिक्षण संचालक

शिक्षकांना कोणतेही वेगळे काम करावे लागणार नाही. दरवर्षी शाळेत कोणते विद्यार्थी दाखल करून घ्यावेत, याबाबतचे दाखलपात्र विद्यार्थी सर्वेक्षण आणि शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण हे नियमित होतच असते.त्यासोबतच असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यासाठी सूचना जारी केल्या आहेत.

### पाचवी, आठवीच्या अनुत्तीर्णांची परीक्षा घ्यायची कधी?

पाचवी आणि आठवीत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेण्याचे शासन निर्देश असल्याने या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घ्यायच्या कधी, असा नवा पेच शिक्षकांपुढे आहे.

शिक्षण विभागाने यंदा राज्यभरात एकसमान परीक्षा वेळापत्रक जारी केल्याने ८ ते २५ एप्रिल या कालावधीत पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा घेतल्या जात आहेत. २५ एप्रिलला परीक्षा संपल्यावर अवघ्या पाच दिवसांत १ कोटी १७ लाख विद्यार्थ्यांचा निकालही द्यायचा आहे.

पाचवी, आठवीत जी मुले अनुत्तीर्ण होतील, त्यांच्या परीक्षा, त्यांच्यासाठी स्वतंत्र वर्ग घेणे, उपचारात्मक अध्ययन करणे ही सर्व कामे कधी करायची? अनेक योजना अंमलबजावणीसाठी शिक्षकांवर लादल्या जात आहेत.नेमके शिक्षकांनी करायचे काय? विकास कोणाचा साधायचा?असा प्रश्न शिक्षक संघटनानी उपस्थित केला आहे.

भर उन्हात परीक्षा सुरू आहे. शैक्षणिक गुणवत्ता का खालावते आहे ? याचा साकल्याने विचार करून त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज मात्र याकडे सरकारच्या दुर्लक्ष असून शिक्षण विरोधी धोरणं या स्थितीला कारणीभूत असल्याचे म्हणता येईल.त्यात भरीत भर म्हणून निपुण भारत उपक्रम, याशिवाय शालेय कामकाज आणि शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षणाबरोबर हे निरक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण म्हणता येईल. मूळ उद्देश बाजूला सारून शासनाला काय साध्य करायचे आहे ? याविरुद्ध आवाज बुलंद करू.

**– संदिप तिडके,**
**अध्यक्ष,महा.राज्य प्राथमिक शिक्षक समिती गोंदिया**

## संविधान जनजागृती व स्वच्छता अभियान

**गोंदिया** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगिण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेमध्ये जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत राज्यात भारतरत्न "डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' हा कार्यक्रम साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने ८ एप्रिल २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन, गोंदिया येथे भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामुहिक वाचन करुन भारतीय जनतेत संविधाना विषयी जनजागृती निर्माण करणे याप्रकारे "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच ९ एप्रिल २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन परिसरातील स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करुन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आले ७ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई** : राज्य मंत्रिमंडळाची आज मुंबई येथे महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्रिमंडळातील इतर सदस्यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीत प्रामुख्याने गृह, महसूल, नगरविकास, विधी व न्याय विभागांना झुकतं माप मिळालं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील नगरविकास विभागांतर्गत सर्वाधिक तीन निर्णय घेण्यात आले आहेत.तसेच मुख्यमंत्र्यांच्या गृह विभागांतर्गत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्देशानुसार कैद्याच्या कोठडीतील मृत्यूप्रकरणी भरपाई देण्याच्या धोरणास या बैठकीवेळी मंजूरी देण्यात आली आहे. त्याचसोबत लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## भाजप जिल्हाध्यक्षपदावर कुणबी,अनु,जाती की जमातीच्या नेत्याला देणार संधी!

**गोंदिया** –लोकसभेतील पराभवानंतर विधानसभेत एकहाती विजय मिळवणार्या भारतीय जनता पक्षाच्या तालुका ते राष्ट्रीयस्तरापर्यंतच्या संघटनात्मक निवडणूकीला सध्या वेग आलेला आहे.महाराष्ट्रात येत्या दिवाळीच्या काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लक्षात घेत तालुका व शहराकरीता ४५ वर्षापेक्षा अधिक वयाचा तर जिल्हास्तरावर ५५ वर्षापेक्षा अधिक वयाचा अध्यक्ष निवडू नये अशा आलेल्या सुचनेनंतर तालुकास्तरावरील अध्यक्षांची जी नावे निश्चित करण्यात आली होती,

ती मात्र पाकिटातच सिलंबद राहिली असून तालुकास्तरावर ४५ पेक्षा कमी वयाच्या व्यक्तीचा शोध सुरु करण्यात आला आहे.त्यातच जिल्हास्तरावर सुध्दा ५५ च्या आतील व्यक्तीचा शोध जिल्हाध्यक्ष पदाकरीता भाजपने घेण्यास सुरवात केली आहे.

गोंदिया जिल्हा अस्तित्वात येऊन २६ वर्ष पुर्ण होत आहेत,या २६ वर्षात भारतीय जनता पक्षाने जिल्हाध्यक्ष निवडतांना ओबीसीतील कुणबी, तेलीसह अनु,जाती व जमातीच्या व्यक्तींना अद्यापही जिल्हाध्यक्ष पदावर बसवल्याचे दिसून येत नाही.भाजपने,ब्राम्हण, मारवाडी,कोहळी,पोवार,कलार, लोधी समाजाला जिल्हाध्यक्ष पदाची संधी दिली असून यावेळी पक्ष यावेळी कुणाला संधी देते याकडे लक्ष लागले आहे.

लोकसभा निवडणूकीत निकालानंतर भाजपाला अपेक्षित यश आले नव्हते. मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश मिळाले.लोकसभेतील निवडणूकीच्यावेळी भाजपमधील अंतर्गत गटबाजी उफाळून आल्याने पराभव झाला होता,हे लक्षात येताच विधानसभेच्या वेळी मात्र ती चूक सुधारली गेली.त्यातच आता जिल्ह्यातील ८ तालुक्यातील तालुका अध्यक्षांच्या निवड प्रक्रियेने वेग घेतला आहे.

**आजपर्यंतचे जिल्हाध्यक्ष**
**राकेश शर्मा, दयाराम कापगते, विनोद अग्रवाल, हेमंत पटले, केशवराव मानकर, येशुलाल उपराडे.**



सडक अर्जुनी,अर्जुनी मोरगाव तालुक्यात प्रत्येकी दोन तालुकाध्यक्ष निवडले जाणार आहेत.गोंदिया व तिरोडा येथे ग्रामीण व शहर अध्यक्षासोबंतच मंडळ अध्यक्षाची निवड होणार आहे.तर आमगाव,सालेकसा,देवरी व गोरेगाव येथे एकाची अध्यक्षपदी निवड होणार आहे.गोंदिया तालुक्यात तर ५ मंडळ अध्यक्षांची निवड होणार आहे.

या सर्वनिवडीनंतर येत्या आठवड्यात जिल्हाध्यक्षाच्या निवडीची प्रकिया होणार आहे.भाजपकडे आजच्या घडीला अनेक नेते जिल्हाध्यक्ष पदाच्या शर्यतीत आहेत.त्यामध्ये आजी माजी लोकप्रतिनिधींचाही समावेश आहे.मात्र भाजपने ज्या विजय शिवणकरांना आधी लोकसभेचे नंतर विधानसभेचे आश्वासन देत राष्ट्रवादी काँग्रेसमधून घरवापसी करवून घेतली,त्या विजय शिवणकरांच्या हाती मात्र पक्षाने अद्यापही काहीच दिलेले नाही.

त्यातच सध्या जिल्हाध्यक्ष पदाच्या निवड प्रकियेच्या हालचालीमूळे व कुणबी समाजाला अद्यापही भाजपने जिल्हाध्यक्ष पदाची संधी न दिल्याने किमान त्यांना या पदाकरीता तरी भाजप पात्र समजते की त्यांचा वापर फक्त करुन घेते याकडेही लक्ष लागले आहे.

त्यातच अनु.जाती जमातीकडेही जिल्हाध्यक्ष पद गेले नसल्याने आणि या पदावर महिलांनाही संधी मिळालेली नसल्याने भाजप या बाबींचा विचार करते काय याकडे बघावे लागणार आहे.अनु.जाती जमातीच्या विचार केल्यास जे.डी.जगणीत, हनवंत वट्टी, श्री.गावराने, शैलेश नंदेश्वर, श्रावण राणा, लक्ष्मीकांत धानगाये अशी अनेक नावे या प्रवर्गातून भाजपच्या राजकारणात सक्रिय आहेत.जे.डी.जगणीत व हनवंत वट्टी यांच्यावर तर भाजपच्यावतीने कौटुंबिक राजकारणाला महत्व दिले गेल्याने अन्याय झाल्याचे बघावयास मिळालेले आहे.

## जिल्ह्यातील ४'आपला'दवाखान्याकडे रुग्णांची पाठ

**गोंदिया** : शहरी भागातील नागरिकांना त्यांच्याच वॉर्डात आरोग्यविषयक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने ङ्गबाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाफ योजना सुरू केली. नागरिकांना मोफत उपचाराची सोय उपलब्ध करण्यात आली. पण, आवश्यक सुविधा पुरविण्यात दिरंगाई होत असल्याने रुग्णांनी या सुविधेकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे. गोंदिया जिल्ह्यातील चार रुग्णालयांतील बाह्यरुग्ण विभागात वर्षभरात केवळ वीस हजारांवर रुग्णांची नोंद झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

गोंदिया जिल्ह्यात छोटा गोंदिया, तिरोड्यात झाकीर हुसेन वॉर्ड, आमगाव आणि अर्जुनी–मोरगाव अशा चार ठिकाणी आपला दवाखाना सुरू करण्यात आला आहे. या चारही ठिकाणी अत्याधुनिक सुविधा, डॉक्टर आणि आरोग्यसेवकांची नियुक्ती केली




गेले. या रुग्णालयाच्या माध्यमातून सर्वसाधारण आजारांसह नेत्रचिकित्सा, स्त्रीरोगतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, त्वचारोग तज्ज्ञ, दंत शल्यचिकित्सा, बालरोग अशा आरोग्यसुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे.

परंतु प्रत्यक्षात या सोयीसुविधा उपलब्ध करण्यास शासनाकडून दिरंगाई होत आहे. त्यामुळे या रुग्णालयांऐवजी रुग्णांकडून ग्रामीण आणि जिल्हा रुग्णालयाचा पर्याय निवडला जात आहे.

गोंदिया जिल्ह्याचा विचार करता बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानासोबतच १७ नागरी आरोग्य वर्धिनीदेखील आहेत. यातील १५ आरोग्य वर्धिनी सुरु असून दोन लवकरच सुरु होणार असल्याची माहिती आहे.

### प्रत्येक ठिकाणी दोन कंत्राटी कामगार

प्रत्येक आपला दवाखाना आणि आरोग्य वर्धिनी केंद्रात दोन कंत्राटी शिपायांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना १५ हजार ५०० रुपये वेतन दिले जाते. प्रत्यक्षात त्यांच्या हाती केवळ आठ हजार रुपयेच मिळतात. दोन हजार रुपये पीएफ आणि अडीच हजार रुपये जीएसटीवर खर्च होत असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले. मुळात हे कर्मचारी जवळपास ग्रामीण भागातील आहेत. सध्या गोंदियामध्ये भाड्याचे घर करून राहतात. यासाठी त्यांना महिन्याकाठी तीन ते पाच हजार रुपये भाडे मोजावे लागते. इतर खर्च मिळून बारा हजारांचा खर्च येतो. ही तूट कशी भरून काढायची असा प्रश्न असल्याचे एका कर्मचाऱ्यांने नाव प्रकाशित न करण्याच्या अटीवर सांगितले.

**रुग्ण तपासणी...**
**आमगाव : ५,५०७**
**अर्जुनी–मोरगाव : ५,७०२**
**गोंदिया : ७,३६७**
**तिरोडा : २,३५२**
**एकूण : २०,९२८**
**(ही आकडेवारी १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ दरम्यानची आहे)**

### भाड्याच्या खोलीतून कारभार

राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही योजना सुरू केली असली तरी यासाठी स्वतंत्र इमारती नाहीत. शहरासह तालुक्यांमध्ये बहुतांश ठिकाणी भाड्याच्या खोलीत हा दवाखाना चालविला जात आहे. या दवाखान्यांसाठी स्वतंत्र इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

## विद्यार्थ्यांना पुस्तक संचाचे मोफत वितरण

**गोंदिया:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडुन विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा दि.८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात ङ्गभारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहङ्ग तसेच दि.११ एप्रिल ते १ मे २०२५ या कालावधीत ङ्गसामाजिक न्याय पर्वङ्ग हे कार्यक्रम साजरे करण्यात येत आहेत. सदर कालावधीमध्ये विविध उपक्रम/कार्यक्रम/स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहेत.त्या अनुषंगाने दि. ११ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, गोंदिया येथील सांस्कृतिक सभागृहात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

साप्ताहिक
बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक
http://berartimes.com
बुधवार,दि.१६ एप्रिल २०२५


## संपादकीय

### प्रज्ञासुर्य महामानवांचे स्मरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. १८९१ मध्ये ते जन्मले आणि १९५६ मध्ये वारले, पण या मधल्या काळात त्यांनी जगाला प्रचंड काही दिले. त्यांनी भारताला संविधान दिले. आज त्या संविधानाच्या बळावर तर भाजप,काँग्रेससह अनेक पक्ष उड्या मारत आहेत. पण आंबेडकर यांनी संविधानासारखी अद्भूत गोष्ट तर दिलीच, पण त्याशिवायही त्यांनी भारतावर एक उपकार केले आहेत. प्रत्येक भारतीयाने त्याचे कृतज्ञतापूर्व स्मरण केले पाहिजे. ती आहे ती म्हणजे त्यांनी देशाला मुस्लीम राष्ट्र होऊ दिले नाही. जेव्हा त्यांनी हिंदू म्हणून मरायचे नाही असे ठरवले तेव्हा अनेक धर्म त्यांच्या पुढे पदर पसरून तुम्ही आमचा धर्म स्वीकारा म्हणून स्वागतार्थ पायघड्या घातल्या होत्या. त्यात मुस्लीमही होते. पण बाबासाहेबांनी तसला अविचार केला नाही व बौद्ध धर्म स्वीकारला आणि देशाचे आज एक अनोखे रूप आपण पाहत आहोत. यामागे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांची दूरदृष्टी आहे. बाबासाहेबांनी देशाला एक फार मोठी बाब दिली आहे ती म्हणजे या देशाची घटना. संविधानाच्या जोरावर आज जे राहुल गांधी आणि तमाम काँग्रेसजन उड्या मारत आहेत त्यांना बाबासाहेबांनी ही भेट दिली आहे. तिचा दुरुपयोग कसा केला हे आपण पाहातच आहोत. पण बाबासाहेबांनी या देशाला संविधान रूपी शस्त्र देऊन तमाम भारतीयांना फार मोठे साधन दिले आहे. बाबासाहेबांनी भारतावर अनेक प्रकारे उपकार केले आहेत त्यापैकी एक आहे ती म्हणजे त्यांनी जीवनभर वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी संघर्ष केला. त्यांनी त्यासाठी समाजातील शोषित आणि वंचित अशा दलित समाजातील वर्गात जागृती केली आणि भारतीय संविधान तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हिंदू म्हणून जन्मलो असलो तरीही हिंदू म्हणून मरणार नाही हे वाक्य त्यांनी तंतोतंत पाळले आणि बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यांच्यासमवेत त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्यांच्यासमवेत तीन लाख ६५ हजार अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मात जात्यंधता आणि इतर अनेक दुर्गुण होते त्यामुळे बाबासाहेबांना धर्म बदलावा लागला पण त्यांचा धर्मपरिवर्तनाचा निर्णय १९३६ मध्येच झाला होता असे इतिहास सांगतो. दलितांच्या उत्थानात हिंदू असणे हा मोठा अडसर आहे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्माची जातीयता आणि जातीची उतरंड त्यांना न पटणारी होती आणि त्यामुळे त्यांनी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. पण त्यांना अन्य कोणताही धर्म स्वीकारावा वाटला नाही हे त्यांचे मोठेपण होते. आपण त्याच्याबद्दलल बोलताना त्यांचे हे मोठेपण कधीच मान्य करत नाही. त्यांचे बौद्ध धर्मात प्रवेश करणे ही हिंदूंची जातीव्यवस्था नाकारण्याची प्रतिक्रियात्मक आणि लाक्षणिक कृती होती आणि त्यांनी समानतेच्या प्रति असलेली कटिबद्धतेशी सुसंगत होती. त्यामुळे त्यांच्या या कृतीकडे केवळ धर्मपरिवर्तन म्हणून न पहाता हिंदू धर्मातील दोष काढून टाकण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. बाबासाहेबांनी लाखो दलितांच्या लेकरांना स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि एक प्रकारचे आत्मभान दिले असे म्हणावे लागेल. बाबासाहेब विद्वान तर हो-तेच. त्यांनी त्यांचे ग्रंथालय अद्ययावत अशा ग्रंथांनी सुसज्ज केले होते आणि त्यांचे परिशीलन त्यांनी आयुष्यभर केले. त्यांनी सतत समानतेसाठी आणि समाजातील जातीभेद दूर करण्यासाठी काम केले त्याला तोड नाही. आज त्यांची गरज प्रकर्षाने जाणवते आहे कारण आज समाजात जातिभेद प्रचंड प्रमाणात फोफावला आहे आणि उच्चनीच भेद प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे आज तर बाबासाहेबांची गरज तर जास्तच जाणवते आहे.

बाबासाहेबांनी धर्म परिवर्तन केवळ हौस किंवा लहर म्हणून केले नाही तर त्यामागे संयुक्तिक कारण, नैतिकता आणि न्याय ही तत्वे होती. याच तत्वांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले आणि संघर्ष केला. बाबासाहेबांनी समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि ती भूमी आज परमपवित्र भूमी म्हणून महाडमध्ये गणली जाते. दलित समाजाच्या व्यक्तीना माणूस म्हणून दर्जा मिळवून देणे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढवणे हे त्यांच्या या कार्याचा लसावि होता असे म्हणावे लागेल. आपल्या पुस्तकात अनिहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकात त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. बाबासाहेबांनी बौद्ध धर्मात प्रवेश का केला यावर आजही चर्चा होत असतात. पण काही विद्वानांच्या मते त्यांनी आकसाने बौद्ध धर्मात प्रवेश केलेला नाही, तर त्यांनी हिंदू धर्माला सुधारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांन त्यात यश आले नाही असे म्हणून ठेवले आहे. या महामानवाला वंदन करण्यामागे त्यांचे केवळ बौद्ध धर्म स्वीकारणे हेच एक कार्य नव्हते तर त्यांनी अनेक दिग्गज हिंदू नेत्यांशी चर्चाही केली होती. त्यात सावरकर होते तसेच टिळकांचा मुलगाही होता. त्यामागे बाबासाहेबांनी आकसाने बौद्ध धर्म स्वीकारला असे म्हणणे चूक आहे. त्यांनी राजकारण केले आणि पहिले ते देशाचे कायदामंत्री होते. त्यांनी समाजाचे प्रबोधन केले आणि हिंदू धर्मावर कोरडे ओढले. पण हिंदू धर्मामुळे त्यांचे कधीही समाधान झाले नाही आणि शेवटी त्यानी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. बाबासाहेब आजही महत्त्वाचे आहेत कारण त्यांनी जी शिकवण दिली आहे तिची आज गरज कधी नव्हे ती जास्त आहे. ६५ वर्षांच्या आयुष्यात बाबासाहेबांनी दलितांना आत्मसन्मान दिला आणि त्यांना शिकले तरच त्यांचा टिकाव लागेल हे तत्त्व शिकवले. त्यानी राखीव मतदारसंघांचा आग्रह धरला आणि त्यासाठी महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात करारही झाला. पण काँग्रेसने तो करार उधळून लावला आणि काँग्रेसने कधीही दलिताना बरोबरचे स्थान दिले नाही. केवळ भाषा मात्र त्यांच्या कल्याणाची करायची आणि पंगतीत त्याचा अपमान करायचा हे शेतकरी नेते नारायण नागू पाटील यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. आपल्या ६५ वर्षांच्या काळात आभाळाएवढे कार्य करणाऱ्या बाबासाहेबांना त्रिवार वंदन.

# आकाश मोजतो मी भीमा तुझ्यामुळे



## बेटियों को पढाना उतना आसान नही होता अगर बाबासाहेब का लिखा हुआ संविधान नही होता ।

जर ते नसते तर काय झाले असते कधी विचार करताय. ते नसते तर शिक्षणाची कवाडे खुली झाली नसती... ते नसते तर ना नोकरी मिळाली असती आणि ना मान सन्मानाचे जगणे मिळाले असते.

माणूस म्हणून जगण्याचे जे हक्क आज मिळाले आहेत ते परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे. आम्ही त्यांना कधीच काही मागितले नाही, परंतू त्यांनी आम्हाला भरभरून दिले. आज बाई माणूस आहे त्याचे कारण बाबासाहेब आहेत. बाईला माणूसपणाची देण हे बाबासाहेबांचे सर्वात मोठे आमच्यासाठी गिफ्ट आहे.

अगर बाबासाहेब का लिखा हुआ संविधान नही होता ।

जगाच्या पाठीवर इतर देशातल्या स्त्रियांना स्वतःच्या हक्कासाठी रक्त सांडवावे लागले... लढाया लढाव्या लागल्यात, शहीद व्हावे लागले पण आमच्या देशात पहिल्या इलेक्शन पासूनच बाबासाहेबांनी आम्हाला मताचा अधिकार देऊन देशाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले... इंग्लंडमध्ये लोकशाही १६८८ साली स्थापन झाली, पण स्त्रियांना मताचा अधिकार मिळवण्यासाठी एकोणवीसावे शतक उजाळावे लागले. अमेरिकेत सुद्धा हा मताचा अधिकार फार उशिरा मिळाला. पण आमच्या देशात बाबासाहेबांनी संविधानातच तशी तरतूद करून ठेवली की, स्त्री असो की पुरुष असो ज्याने वयाची २१ वर्षे पूर्ण केली आता मात्र ती १८ वर्षे झाली. गरीब असो की श्रीमंत असो त्या प्रत्येकाला मताचा अधिकार देऊन देशाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांनी सामील करून घेतले. आणि म्हणूनच म्हटले जाते ङ्गसमतेचा ङ्गपर्यायी शब्द म्हणजे बाबासाहेब.

बाबासाहेब एके ठिकाणी म्हणतात, जगाकडे स्त्रीच्या नजरेने पहा... स्त्रिया ह्या समाजाचा अलंकार आहेत. त्यांच्या आरोग्याची त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे हे समाजाचे कर्तव्य आहे आणि म्हणून त्यांच्यावर अतिरिक्त बाळंतपणे लादून त्यांची हेडसांड करू नका.

बाबासाहेब स्त्रियांचे स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते. एकदा माई साहेब त्यांना गमतीने म्हणाल्या की, तुम्ही मला काय दिले बाबासाहेब म्हणतात ममी तुझ्यासाठी हिंदू कोड बिल दिले.

बाबासाहेब हे देशाचे भाग्यविधाते आहेत. अस्पृश्य म्हणून वाट्याला आलेली अवहेलना यांची अजिबात तमा न बाळगता घरसंसार व्यवसाय व समाज बांधवांसाठी ते अविरत झटत राहिले. साधी राहणी, अविरत अध्ययन आणि प्रचंड इच्छाशक्ती यांच्या बळावर त्यांनी आपल्या सखोल अध्ययनाची लालसा पूर्णत्वास नेली.

बाबासाहेबांचा विशेष गुण म्हणजे ज्ञान उपासना. मनन चिंतन व ग्रंथ प्रेम. बाबासाहेबांचे वडील रामजी सपकाळ यांनाही पुस्तकांचे वेड होते. ते मिलिटरीच्या शाळेत शिक्षक आणि त्याच ठिकाणी महात्मा ज्योतिबा फुले सुद्धा प्रमुख शिक्षक होते .साहजिकच रामजी सपकाळ यांच्यावर महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचाराचा प्रभाव पडला आणि त्या विचाराच्या दळणघडणीत रामजी सपकाळ घडत गेले आणि ते संस्कार नंतर बाबासाहेबांमध्ये अंकुरित झाले. जातीभेदाचे प्रचंड चटके अनुभवल्यानंतर बाबासाहेबांनी समाजातील अस्पृश्यतेचे समूळ विच्छेद व्हावा म्हणून अविरत लढा दिला.

बाबासाहेबांचा सर्वात महत्वाचा त्याग म्हणजे हिंदू कोड बिल. १५ फेब्रुवारी १९५१ मध्ये हिंदू कोड बिल बाबासाहेबांनी संसदेत मांडले. सलग चार वर्ष त्यापूर्वी हिंदू कोड बिलासाठी बाबासाहेबांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी न करता लिखाण केले. मेहनत घेतली शेवटी त्रागांनी हिंदू कोड बिल पास होत नाही म्हणून २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला ...बाबासाहेबांच्या विरुद्ध गदारोळ उठविला गेला होता हिंदू कोड बिल पास झाले तर हिंदू धर्माला हानी पोहोचली. हिंदू धर्म भ्रष्ट होईल बाबासाहेबांच्या अलीपूर येथील निवासस्थानासमोर महिलांनी मोर्चा काढला त्यावेळी बाबासाहेबांनी स्त्रियांना बोलावून विचारले हे माझे आया भगिनींनो हे सारे मी तुमच्यासाठीच करीत आहे, तरी तुम्ही माझ्याविरुद्ध घोषणा का देतात? त्यातील साऱ्यांनाच गहिवरून आले .त्या म्हणाल्या बाबासाहेब हे सारे माहित आहे पण आमच्या कुटुंबीयांनी आम्हाला सांगून ठेवले, जर तुम्ही बाबासाहेबांच्या विरोधात घोषणा दिल्या नाहीत तर आम्ही तुम्हाला घरात घेणार नाहीत बाबासाहेबांना गहिवरून आले.

वीस कलमापैकी चार कलमे पास झालीत म्हणून बाबासाहेबांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बील म्हणजे स्त्रियांचे स्वातंत्र्याची सनद .आम्ही आमच्या कातड्याची जोडी जरी बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या पायात घातले तरी ते पांग फेडू शकणार नाही, एवढे प्रचंड उपकार बाबासाहेबांनी आमच्यावर केलेत... काय आहेत त्या चार कलमात

**एक विवाह अंतर्गत स्थैर्य.**

एक पुरुष एका स्त्रीशी विवाह करेल. कारण सवतीची भीती स्त्रियांच्या डोक्यावरती असायची. बाबासाहेबांनी एकाच कलमात काढून टाकली. आपला नवरा आपल्याला सोडून दुसरी आणणार तर नाही ही भीती स्त्रियांच्या डोक्यावर असायची त्यापासून स्त्रीमुक्त झाली. नंतरचा अधिकार म्हणजे घटस्फोटाचा अधिकार. आमच्या धार्मिक धर्मग्रंथांना सांगून ठेवले की नवरा कसाही असला तर त्याचे देव समजून पूजा करा भला आहे बुरा है कैसा भी है मेरा पती मेरा देवता है. बाबासाहेब स्त्रियांना हा घटस्फोटाचा अधिकार देताना लिहितात पती दारुडा असेल, तो व्यभिचारी असेल, तो आजारी असेल, नपुसक असेल तर स्त्रीला घटस्फोट मागण्याचा अधिकार आहे.

त्यानंतरचा अधिकार म्हणजे अल्पवयीन मुलाच्या पालकत्वाचा अधिकार. मूल जेव्हा छोटं असेल तेव्हा ते आईच्या जवळ राहील आणि सर्वात महत्त्वाचा अधिकार म्हणजे संपत्तीचा उर्फ वारसा हक्काचा अधिकार आज माहेर असो की सासर दोन्ही ठिकाणच्या संपत्तीवर स्त्रीचं नाव चालत असते.

**उदरनिर्वाहाचा अधिकार**

अविवाहित असेल तर भावाला आणि बापाला पोटगी मागील आणि विवाहित असेल तर नवऱ्याच्या अर्ध्या प्रॉपर्टीची मालकीण. हिंदू कोड बिल हा कायदा कायदेमंडळाने या अगोदर केलेल्या सर्व कायद्याबद्दल हा सर्वात महत्त्वाचा आहे. १९५१ ला सर्व महिलांच्या स्वातंत्र्यासाठी व हितासाठी आणि ओबीसींना आरक्षण मिळावे म्हणून बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला व त्याग केला पण हा कायदा१९५५ ला मंजूर झाला ...

सहशिक्षणापासून ते जोडीदार निवडण्याच्या अधिकारापर्यंत सर्व टप्प्यावर स्त्रीच्या विकासाचा आणि उन्नतीचा मार्ग सांगताना त्यांनी स्त्रीच्या सर्वांगीण विकासाचा विचार केलेला दिसतो. राष्ट्रीयता, धर्मनिरपेक्षता, नीतिमत्ता संस्कृती अशा मूल्यांना घेऊन बाबासाहेब स्त्री प्रश्नाविषयी आग्रही राहिले. व्यक्ती स्त्री आणि राष्ट्र हे प्रतिष्ठा, निष्कलंकता आणि स्वातंत्र्य याशिवाय कृतज्ञ राहू शकत नाही आज तर शिकलेल्या स्त्रियांची तिसरी चौथी पिढी कितीतरी पुढे गेलेली आहे. बाबासाहेबांच्या विचारातील अक्षरं अक्षर तिने आपल्या हृदयात कोरून ठेवलेले आहे.

अन्न वस्त्र निवारा आरोग्य आणि शिक्षण हे नैतिक जबाबदारी आहे. तरुणाई हे प्रत्येक समाजाचे मिसाईल असते, त्याला योग्य दिशा मिळाली तर समाज प्रगतीप-थावर पोहोचू शकतो .पण जर हे मिसाईल मिसगाईड होत असेल किंवा झाले असेल तर त्या समाजाला विनाशापासून कोणी रोखू शकत नाही. त्यामुळे १९२० सालचा ऐतिहासिक वारसा जपत असताना केवळ अभिमान नव्हे तर बाबासाहेबांच्या वैचारिक आदर्शाची पायाभरणी होणे समाजाच्या उज्जवल भविष्यासाठी अत्यावश्यक झाले आहे..

**तरी बलिदान से ही मिली है**
**मेरे वजूद को शोहरत**
**वरना मेरा जिक्रही कहा था**
**तेरे संविधान के पहले...**

**ॲड. सविता बेदरकर**
**गोंदिया**

# अतुलनीय नायक भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील सामाजिक चळवळीचे सर्वश्रेष्ठ नायक आ-हेत. भारतातीलच नव्हे तर वैश्विक संदर्भातही बाबासाहेबांचे मानवमुक्तीचे कार्य संपूर्ण जगातील सामाजिक चळवळीसाठी कायम मार्गदर्शक आणि प्रेरणादायी राहील यात शंका नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वनायक पदापर्यंतच्या प्रवासाचा मूलाधार जर कोणता असेल तर तो आहे त्यांचे शिक्षण... त्यांचा विद्याव्यासंग त्यांचे ग्रंथवेड... डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांड पंडित होते. अनेक विषयांवर सखोल अध्ययन करून अत्यंत मूलगामी चिंतन त्यांनी मांडले, सिद्धांत मांडले आणि आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी मांडलेले मौलिक विचार आजही प्रमाण आहेत.

पिढ्यानब पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेला समाज, अविद्येच्या गर्तेत सापडलेला समाज ह्या दुष्टचक्रामुळे संवेदना हरवून बसला होता.

**“उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे”**

डॉ. बाबासाहेब म्हणत ङ्गशिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो



ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरऽगुरल्याशिवाय राहणार नाही.ङ्ग

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की, आपली लोकं शिक्षणात मागे असल्यामुळे शिक्षण हीच आपल्या लोकांची महत्तम गरज आहे. शिक्षण हेच त्यांच्या प्रगतीचे साधन आहे. शिक्षणाच्या अभावामुळे हा समाज अधोगतीला प्राप्त झाला आहे, स्वत्व गमावून बसला आहे, अनुत्पादक झाला आहे. त्यामुळे शिक्षणाशिवाय तरण-ोपाय नाही. शिक्षणाशिवाय समाजाचे कोणत्याही प्रकारचे हित साधने शक्य होणार नाही. डॉ. बाबासाहेब म्हणत-

ङ्गसर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा राजमार्ग आहे. शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकीकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती यांचा शिक्षण हा पाया होता.ङ्ग

**समाजाला संदेश :शिका, संघटित व्हा, संघर्ष करा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या अ.भा. दलित परिषदेप्रसंगी दिलेल्या भाषणात संदेश दिला होता,त्या भाषणाचे शेवटचे वाक्य होते.. ङ्गतुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा, ते थोर पुरुष होणार आहेत, असे त्यांच्या मनात बिंबवा, त्यांच्या हीनगंड नाहीसा करा.

शिक्षणाची कास धरून समाजाला प्रगतिपथावर घेऊन जाण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज लक्षात घेऊन सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता आणि जो संघर्ष बाबासाहेबांना अभिप्रेत होता तो भौतिक लाभाकरिता किंवा सत्तेकरिता नव्हता तर तो माणसाच्या मुक्तीचा संघर्ष होता, तो आनंददायक होता, तो चैतन्यकारक होता.

**डॉ. बाबासाहेब या भाषणात म्हणतात-**

तुम्ही सर्व जन विद्या शिकण्यासाठी आला आहात. पण, माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही, विद्येबरोबर भगवान बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपणा, शील म्हणजे सदाचार संपन्न असे आचरण, करुणा म्हणजे सर्व मानवजातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्व प्राणीमात्रांविषयीची आत्मियता या चार पारमिता असल्याच पाहिजे तरच विद्वतेचा काही उपयोग आहे. विद्येबरोबरच मानवाजवळ जर करुणा नसली तर तो कसाई आहे. करुणा म्हणजे माणसा माणसावरचे प्रेम! ह्याच्यापुढेही मनुष्य गेला पाहिजे व त्याने मैत्री संपादन केली पाहिजे ही विचारसरणी जर कोणी मांडली असेल तर ती भगवान बुद्धांनीच होय.

विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र्य बनविले पाहिजे आणि या मार्गाने एकट्यानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे शैक्षणिक विचार अत्यंत मौलिक आहेत, ते स्थलकाल निरपेक्ष आ-हेत. आजही ते तेवढेच चिंतनीय, अनुकरणीय व प्रेरणादायी आहेत...!!

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने महामानवास विनम्र अभिवादन !!!

**सौ.वैशाली दिलीप वाघमारे**
**बोळेगांवकर नांदेड**



# खोडशिवणीत ग्राम स्वच्छता अभियानाची केली तपासणी

**सडक अर्जुनी-** तालुक्यातील खोडशिवणी येथील ग्रामपंचायतीला संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानात तालुक्यात प्रथम आल्याने जिल्हास्तरीय तपासणी समितीने नुकतीच या ग्रामपंचायतीची तपासणी केली. तपासणीत गावातील व्यक्तीला शौचालय, पिण्याचे पाणी, शाळेची तपासणी अशा अनेक बाबतीत गावाची पाहणी केली. या जिल्हास्तरीय तपासणीत अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी खोटेले, स्वच्छता विभागाचे भागचंद रहांगडाले आणि इतर समिती सदस्य उपस्थित होते. सरपंच गंगाधर परशुरामकर, उपसरपंच सत्यवान नेवारे, पंचायत समिती सदस्य आर. बी. वाढई आणि ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य सोसायटीचे अध्यक्ष उद्धव परशुरामकर, ग्रामपंचायत अधिकारी ओमेश कापगते, शाळेतील सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका व गावकरी उपस्थित होते.

# संविधान सन्मान कशासाठी ?

आपल्या देशामध्ये यावर्षी भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. सन १९५० ला भारताची राज्यघटना अंमलात आली आणि तेव्हापासून दरवर्षी २६ जानेवारी या दिवशी भारताचा गणराज्य दिन साजरा करण्याची प्रथा निर्माण झालेली आहे. वास्तविक पाहता भारतीय संविधानाची अंमलबजावणी झाल्यानंतर भारतीय समाज व्यवस्थेत रुजलेल्या अनेक विषमतामुलक प्रथा - परंपरा बंद होऊन त्या ठिकाणी लोकशाही मूल्यात्मक व्यवस्था निर्माण झाली. त्या व्यवस्थेला भारतीय संविधानाने मजबुती दिली. भार-ताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक नवी राजकीय व्यवस्था या देशात अस्तित्वात आली. त्याचबरोबर काही मूल्यात्मक बदलही घडून आलेत. पारंपरिक राजकीय व्यवस्थेपेक्षा नवी राजकीय व्यवस्था साकार होत असताना आधुनिक लोकशाही समाज घडवणारी ही मूल्ये अतिशय महत्त्वाची ठरतात. त्यामुळे ज्या दिवशी संविधान लागू होऊन प्रजासत्ताक गणराज्य स्थापन झाले त्या दिवसाचे स्मरण करत असताना ही मूल्यव्यवस्था समजून घेणे फार आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात पारंपरिक मूल्यव्यवस्था संपूर्णतः वर्ण-जातीवर आधारित होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या देशातील तमाम स्वातंत्र्यप्रिय जनतेच्या आशा पल्लवित झाल्या. स्वातंत्र्य चळवळी दरम्यानच्या काळात मआधी सामाजिक की आधी राजकीय स्वातंत्र्य?फ यावर अभूतपूर्व रणकंदन होऊन मस्वराज्यातही सुराज्यफ असले पाहीजे अशाप्रकारचे जनमानस तयार झाले. या देशाला मिळा-लेले स्वातंत्र्य समता,न्याय, बंधुता या तत्त्वावर आधारित असून भारतीय संविधानानुसार या तत्वांचा अंगीकार होऊन भारतीय लोकशाही प्रौढ झाली असल्याचे बोलले जाते. तात्विक दृष्टीने सामान्यातील सामान्य माणूस प्रधानमंत्री अथवा राष्ट्राध्यक्ष पदावर पोहोचले असल्याचे मानले जात आहे. सामाजिक भेदाभेद, वंश, लिंग, प्रांत भेद मिटून त्या ठिकाणी समतावादी लोकशाही न्यायव्यवस्था प्रस्थापित झाली त्यामुळे गणराज्य दिवसाचे महत्त्व नवसमाज निर्मितीसाठी मैलाचा दगड आहे असे समजले जाते. त्यामुळे संविधानाचे अढळ स्थान ध्यानात येते. असे असताना संविधान विरोधी शक्ती संविधान बदलण्याची भाषा वापरतात. संविधानाने त्यांचं काय वाकडं केलं? त्यांची उच्च जात व्यवस्था आव्हानात्मक केली.संविधान अंमलात येण्यापूर्वी अनेक राजकीय स्थित्यंतरं या देशात घडली. पण सामाजिक, धार्मिक व्यवस्थेला सांस्कृतिक वर्चस्वाला जराही धक्का बसला नाही.हजारो वर्षे ङ्गइथे वैदिक धर्मच दृढमूल होता.प्राचीन काळाचा धार्मिक इतिहास सांगतो की, ही परिस्थिती परंपरागतच होती. केवळ महाराष्ट्रातच नाही तर सर्व भारतभर वैदिक धर्मच सर्वाधिक प्रभावी होता. आणि त्या वैदिक धर्माची इमारत चातुर्वर्ण्याच्या पायावर उभी आहे. चातुर्वर्ण्याचा अर्थ आहे. विषमतेचा व्यवहार. आणि तो केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नाही तर दैनंदिन व्यवहारातही. यानेच साऱ्या भारतीय समाजाला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र वर्णांमध्ये विभक्त केले. व्यवहारात आपण नेहमी हेच पाहतो की, एकमेकांसोबत खाणे-पिणे करणाऱ्यांमध्ये किंवा विवाह संबंध करणाऱ्यांमध्ये स्नेहसंबंध दृढ होतो. एक दुसऱ्याच्या कामात ते अधिक प्रेमाने रुची घेतात. समाजाच्या या वर्णांना वैदिक मार्गाने या दोन्ही संबंधांपासून वंचित करून ठेवले आहे. वर्णा-वर्णामध्ये परस्पर रोटी-बेटी व्यवहार बंद केला गेला. सामाजिक उच्च-नीचतेच्या दृष्टीनेही या विभिन्न वर्णांमध्ये समानता नव्हती. ब्राह्मणापेक्षा क्षत्रिय, क्षत्रियापेक्षा




वैश्य आणि वैश्याहून शूद्र कनिष्ठ होता. उच्चवर्णीय लोक समाजाशी वाटेल तसा व्यवहार करू शकत होते परंतु नीचवर्णीयांना उच्चवर्णीयांचा थोडाही स्वाभिमान दुखावणारा व्यवहार दंडास पात्र असे पाप समजले जात होते. परिणामी समाजाच्या सर्व धार्मिक व्यवहारांचे तसेच ज्ञान-विज्ञानाचे ठेकेदार ब्राह्मण बनले, बाहुबलाने मिळवलेल्या राज्याचे अधिपती क्षत्रिय झाले, समाजाचा सर्व आर्थिक व्यवहार वैश्यांच्या हाती सोपवला गेला आणि या सर्व वर्णांची सेवा करण्याचा अधिकार निःस्पृह शूद्रांच्या वाट्याला आला.ङ्ग(पृ.४-५, मराठी संतांचे सामाजिक कार्य, ले. डॉ वि. भि. कोलते, जुलै २०२३) या व्यवस्थेने सर्वाधिक शोषण स्र्त्रिशुद्रातिशुद्र या समाज घटकांचं केलंय. परिणामतः विभिन्न ऐतिहासिक कालखंडात वैदिक व्यवस्थेविरुद्ध हजारो वर्षे निकराने समतेचा लढा चालत राहिला.पण संविधानाने या लढ्यास खऱ्या अर्थाने वैधानिक सामर्थ्य दिले. सर्व नागरिक समान असून सर्वांना मतदानाचा हक्क,अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले. स्त्रीशुद्रातिशुद्रांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला त्यामुळे उच्चजातीयांच्या शिक्षण आणि नोकरशाहीतील एकजातीय पुरुषांच्या मक्तेदारीसमोर नवे आव्हान उभे राहिले. त्यांच्या पारंपरिक उच्च स्थानाला धक्का बसला म्हणून संविधानावर तुटून पडण्याची नौबत संविधान विरोधकांवर आली. तर त्यांना शह देण्यासाठी संविधान मूल्ये अंगिकार केलेली प्राज्ञ जनता संविधान सन्मानासाठी पुढे सरस-ावलेली असते.

मागील वर्षी याच महिण्यात लोकसभा निवडणुक पार पडली. त्यावेळी निवडणुक प्रचारादरम्यान मसंविधान वाचवणेफ या विषयावर गांभीर्याने चर्चा तर झालीच या मुद्द्याचा निकालावरही परिणाम झाला. संविधान विरोधी शक्तीच्या मनातील शेतकरी ओबीसी दलित आदिवासी बेरोजगार यांच्या विरो-धातील मनसुबे मुखर होऊ ला-गले. त्यामुळे या देशातील नव्वद टक्के श्रमिक कष्टकरी जनतेच्या हितासाठी संविधान सम्मान संमेलने देशभर आयोजित होऊ लागलीत. आणि या संमेलना-तून राजकीय सामाजिक एकीची अपरिहार्यता अधोरेखित होऊ लागली. संविधानातील लोकशाही समाजवादी मूल्ये, समता स्वातंत्र्य बंधुता या तत्त्वासाठी उभा राहिलेला लढा त्याला हजारो वर्षांचा इतिहास साक्षी आहे. हा लढा केवळ राजकीय स्वरु-पात दिसत नाही तर, सांस्कृतिक संघर्षात त्याचे अस्सल मर्म दडलेले आहे. आर्य आक्रमणाप-ासून सिंधुजनांचा सुरू झालेला हा संघर्ष वर्णवर्चस्वाविरोधात अधिक धारदार होता. सिंधुजनांच्या आत्मसन्मानासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या बळी वंशातील महायोद्ध्यांचे या लढ्यातील अतुलनीय योगदान राहिले. ही संविधानिक मूल्ये अवैदिक परंपरेतील प्रत्येक महामानवाने आणि स्वाभिमानी बळीजनांनी आपल्या काळजात जपून ठेवलीत. त्यासाठी प्राणपणाने लढा देत लोकायत, जैन, बौद्ध तत्त्वज्ञान निर्माण झाले. लिंगायत महानुभाव, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदायातील संत परंपरा या व्यवस्थेतील असंवैधानिक तत्वाविरोधात ठामपणे लढले. म्हणून या मानवतावादी मूल्यांचे हजारो वर्षे आत्मियतेने जतन आणि संवर्धन झाले. धार्मिक सुधारणावादी मत प्रवाहाचे तमाम अध्वर्यू,सामाजिक सुधारक, महामानव यांनी दाखविलेला मार्ग खऱ्या अर्थाने समतावादी मूल्यव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आहे. त्याची प्रासंगिकता आजदेखील तसूभरही कमी झालेली दिसते का ?

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत मआम्ही भारताचे लोकफ हे संविधान अंगिकृत अधिनियमित करुन स्वतःप्रत अर्पण अंगिकृत करतात याचा अर्थ या देशातील सामान्यातील सामान्य माणूस जो प्रधानमंत्री , राष्ट्रप्रमुख पदावर बसू शकतो अशा व्यक्तीपासून तर फाटक्या माणसापर्यंत प्रत्येक व्यक्तीची संविधान वाचविण्याची जबाबदारी आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टाने संविधानास वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपात आणले, त्यामुळे स्त्रीशुद्रातीशुद्रांच्या शैक्षणिक सामाजिक राजकीय जीवनातील आमूलाग्र बदल नजरेत भरण्यासारखे आहेत.ङ्ग डॉ. आंबेडकरांनी संविधान निर्माण केले, आणि त्याचा लाभ आंबेडकरी जनतेला मिळाला म्हणून संविधान वाचविण्याची जबाबदारीही आंबेडकरी जनतेच-ीचङ्ग हे सेट नॅरेटीव संविधाननिष्ठ, लोकशाहीवादी, स्वातंत्र्यप्रेमी माणसाला संविधान बचाव आंदोलना पासून दूर सारणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. जन-तेचा हा लढा म्हणजे एका व्यापक शक्तीमान शोषणव्यवस्थेविरोधातील असून केवळ मसंविधान विरोधी सत्ताधारी बदलून दुसऱ्या एखाद्या राजकीय पक्षाचे सरकार यावेफ इतकासा त्याचा हेतू पुरेसा नाही तर, स्वातंत्र्य समता बंधुता न्याय यावर उभी राहिलेली लोकशाही जीवनपद्धती पुरस्कारणारी, संविधानाने बळकट केलेली प्रजासत्ताक गणराज्य व्यवस्था शाबूत ठेवण्यासाठी ही लढाई असल्याचे आणि त्यासाठी संविधान वाचवायला हवे हे आता सर्वमान्य झाले आहे.

**अनुज हुलके**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जिल्हातील ६० हजार विद्यार्थी १० दिवसापासून उपाशी!



## जिल्ह्यासाठी लागतो ३०० मेट्रिक टन तांदूळ

**जिल्ह्यात जि.प. व खासगी अशा एकूण १६६९ शाळा असून यात इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेणारे एकूण १ लाख विद्यार्थी आहे. या विद्यार्थ्यांना वर्षभर पोषण आहारासाठी ३०० मेट्रिक टन तांदूळ लागतो. तांदळासह पोषण आहारासाठी लागणारे साहित्य कंत्राटदारामार्फत पुरविले जाते.**

**गोंदिया :** इयत्ता१ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. मात्र जि.प. व खासगी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या ६० हजारांवर विद्यार्थ्यांना गेल्या १० दिवसांपासून पोषण आहार दिला जात नसल्याचा प्रकार गोंदिया जिल्हात पुढे आला आहे. शासनाने नियुक्त केलेल्या पुरवठादाराने शाळांना तांदूळ व इतर साहित्याचा पुरवठा न केल्याने ही वेळ आल्याची माहिती समोर आली आहे.यावरून गोंदिया जिल्हातील सबंधित विभागातील अधिकाऱ्यांची कार्यप्रणाली आणि तत्परतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे?

इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत आठवडाभर दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी आता शिक्षण विभागाकडून मेन्यूचे प्रकार ठरवून देण्यात आले आहे. प्रत्येक दिवसाचे मेन्यू कार्ड शिक्षक आणि मुख्याध्यापकांना दिले आहे. यातून विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळत असला तरीही निधीअभावी शिक्षकांनाच पदरमोड करावी लागत आहे. यासोबतच त्याचा हिशेब ठेवताना ही त्रास सहन करावा लागत आहे . विद्यार्थ्यांना पोषण आहारात सतत खिचडी दिली जात असल्याने आता आहारात वैविधता आणण्यासाठी विविध पाककृतींचा समावेश केला आहे. या पोषण आहारानुसार विद्यार्थ्यांना महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील मंगळवारी हरभऱ्याचे उसळ व भात आणि दुसऱ्या आठवड्यातील मंगळवारी त्यात बदल केला जातो. परंतु शाळांना कंत्राटदाराकडून त्या वस्तूंचा वेळेत पुरवठाच होत नाही. परिणामी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारापासून वंचित राहावे लागत आहे. जिल्ह्यात इयत्ता १ ते ८ वीपर्यंत शिक्षण घेणारे १ लाख विद्यार्थी आहे. सध्या शाळा सकाळ पाळीत सुरु आहे. त्यामुळे विद्यार्थी सकाळी ७ ते ११ या कालावधी शाळेत असतात. सकाळची शाळा असल्याने बरेच विद्यार्थी शाळेत पोषण आहार मिळत असल्याने घरुन उपाशी येतात. मात्र गेल्या दहा दिवसांपासून शाळांमध्ये पोषण आहार मिळणे बंद असल्याने विद्यार्थ्यांना उपाशीपोटीच धडे घ्यावे लागत आहे. शाळांचा पोषण आहार तयार करण्यासाठी अन्नधान्याचा पुरवठा करण्याची मागणी शाळांकडून करण्यात आली. पण अद्यापही शाळांना अन्नधान्याचा पुरवठा न झाल्याने जवळपास ६० हजारांवर विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित आहे.

शासनाने पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराने शाळांना गेल्या दहा दिवसांपासून तांदूळ आणि इतर साहित्यांचा पुरवठा न केल्याने शाळांमध्ये पोषण आहार तयार करणे बंद झाले आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पोषण आहारापासून वंचित राहावे लागले . कंत्राटदाराकडून तांदूळ व इतर साहित्याचा पुरवठा करण्यास विलंब झाल्याने पोषण आहार तयार करण्याची अडचण निर्माण झाली. याची सूचना संबंधितांना केली असून तीन चार दिवसात सर्व शाळांना पोषण आहाराचा पुरवठा होऊन विद्यार्थ्यांना नियमित पोषण आहार मिळेल. पुरवठ्याची अडचण आता दूर झाली आहे.असल्याची माहिती शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी माध्यमांना दिली.

### ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**गोंदिया:** केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालय व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने विशेष राष्ट्रीय ई-श्रम पोर्टलवर नोंदणी अभियान ७ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. तरी गीग व प्लॅटफफॉर्म वर्करसनी १७ एप्रिल २०२५ पर्यंत या नोंदणी शिबिरात सहभाग घेऊन ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी किंवा संकेतस्थळावर स्वयं नोंदणी करावी.

# प्रहार जनशक्तीचे रात्रीला आमदारांच्या घरावर मशाल मोर्चा



**गोंदिया:-** राज्यातील शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्ज माफी, शेतमालाला हमीभाव यासह इतर मागण्यांना घेऊन ११ एप्रिल रोजी मध्यरात्रीच्या सुमारास तिरोडा गोरेगावचे विजय रहांगडाले, आमगाव-देवरीचे आमदार संजय पुराम यांच्या घरापुढे प्रहारचे कार्यकर्ते व शेतक-यांनी मशाल आंदोलन केले. तिरोडा येथील शहीद गोवारी स्मारक समाज भवन या ठिकाणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्ते व शेतकरी एकत्रित झाले व रात्री ९.३० वाजता मशाल घेऊन तिरोडा शहरातील मुख्य रस्त्या वरून फिरत चंद्रभागा मार्गावर आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते घोषणा देत संपूर्ण शेतकरी कर्जमाफी सात/बारा कोरा करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या निवडणूक काळातील घोषणा ची आठवण करून देण्यात आली.

तसेच शेतमालाला हमी भाव सरकार देऊ शकत नाही म्हणून पेरणी ते कापनी व मळणी चे कामे महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत करण्यात यावे, इतर राज्यात दिव्यांग बांधवांना त्याचा अल्प मानधनात भागत नाही करीता जास्त मांनधन दिले जाते.म्हणून महाराष्ट्र राज्यातील दिव्यांग बांधवांना सहा हजार मानधनात वाढ करावी, भूमिहीन मजुर अकस्मात दुर्घटना झाली तर एकही योजना नाही आहे म्हणून भुमिहीन शेतमजूर ला गोपीनाथ मुंडे योजना च्या धर्तीवर शेतमजूर कुटुंबाला विमा सुरक्षा कवच द्या आदी मागण्या करण्यात आल्या. नंतर मोर्चा तिरोडाचे आमदार विजय रहांगडाले यांच्या घरी पोहोचला. तेव्हा आमदार घरी नसल्याने त्याच्याशी फोनवर आपल्या मागण्याबाबत चर्चा करुन आमदारांचे प्रतिनिधी म्हणून तिरोडा भाजप शहर अध्यक्ष स्वानंद पारधी यांनी त्यांचा निवेदन स्वीकारले.त्याचप्रमाणे आमगाव-देवरीचे आमदार संजय पुराम यांच्या पुराडा निवासस्थानी आमदारांच्या पत्नी सविता पुराम यांनी निवेदन स्विकारले.

हे आंदोलन प्रहारचे जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर,जिल्हा सचिव महेंद्र नंदागवळी,तिरोडा तालुका अध्यक्ष प्रदीप निशाने,पंचायत समिती सदस्य सौ.वनितताई भांडारकर,गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष रतन खुळिसगे,गोपीळ शेन्डे , रवि फुलझले, गुड्डू सोनवणे,शुभम आदमने, रुपेश वासनिक,आशिष आदमने सुदाम मेश्राम,राजू मेहर उपसरपंच, नरेश ठवक्कर,नारायण खगार उरकुडा उके रवि भांडारकर अन्य कार्यकर्ते शेतकरी भुमिहीन शेतमजूर दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने स्वंयस्फूर्तीने सहभागी झाले.

# बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक एकता व समता प्रस्थापित करा :आमदार बडोले




**अर्जुनी-मोर-** आनंद बुद्ध विहार समिती बाकटी यांच्या वतीने भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व भगवान बुद्ध मूर्तीची प्रतिस्थापना व अनावरण सोहळा उत्साहात व धर्मभावनेने पार पडला. यावेळी गावातील नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून मंजूर १० लक्ष रुपयांच्या निधीतून सिमेंट रस्त्याच्या बांधकामाचे भूमिपूजन ही करण्यात आले.

याप्रसंगी आमदार राजकुमार बडोले यांनी विचार व्यक्त करताना सांगितले की, बाबासाहेब डॉ. आंबेडकर हे भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार होते. त्यांनी दलित, वंचित, शोषित घटकांना शिक्षण व हक्कांचे शस्त्र दिले. आज आपण त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक एकता व समता प्रस्थापित करण्यासाठी कार्यरत राहिले पाहिजे. बाबासाहेबांनी दिलेला संदेश शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा आजच्या काळात अधिक प्रासंगिक आहे. अशा शब्दांत त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमात जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर, मुर्तीदाते डॉ. मुकुंद बोरकर, पंचायत समिती सभापती आमपाली डोंगरवार, भन्ते शिलानंद, भन्ते डॉ. धम्मज्योती भन्ते, भन्ते बोधीजी, जिल्हा परिषद सदस्य रचना गहाणे, पंचायत समिती सदस्या पुष्पलता दृगकर , सरपंच सरीताताई राजगिरे, उपसरपंच गुलशन सांगोडे, रतन बडवाईक पोलिस पाटील कपिल मेश्राम अध्यक्ष तंटामुक्त समिती , माजी प्राचार्य हेमंत राजगीरे,राजहंस ढोके, प्रमोद मेश्राम, प्रशांत शहारे, सुभाष मेश्राम, लोकेश सागोळे, अजय देशपांडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.


# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत सौ. भारती कटरे द्वितीय




**गोरेगाव :** राज्य शैक्षणिक संधोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र पुणे द्वारा आयोजित शिक्षकांसाठी तालुकास्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये परशुराम विद्यालय मोहगावं बु. च्या सहाय्यक शिक्षिका सौ. भारती खेमेंद्र कटरे यांनी गणित विषयात द्वितीय क्रमांक पटकावला.

या तालुकास्तरीय स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पंचायत समिती गोरेगाव च्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पंचायत समिती सभापती चित्रकला चौधरी, उपसभापती रामेश्वर महारवाडे, गटविकास अधिकारी एच. व्ही. गौतम, गटशिक्षण अधिकारी एम. डी. पारधी, अधिव्याख्याता पूनम घुले, गट समन्वयक एच. एम. बोपचे, शिक्षण विस्तार अधिकारी डी.टी. कावळे प्रामुख्याने उपस्थित होते. एकूण चार गटातील भाषा, गणित, इंग्रजी, सामाजिक शास्त्र, विज्ञान या प्रत्येक विषयात प्रथम, द्वितीय व तृतीय असे ४८ शिक्षकांना बक्षीस देण्यात आले.

सर्व शिक्षकांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदर स्पर्धेत प्रथम पारितोषिक ३०००रु द्वितीय पारितोषिक २००० रु. तर तृतीय पारितोषिक १५००रु. देण्याचे नियोजित आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गट साधन केंद्र गोरेगाव चे सर्व कर्मचारी यांनी सहकार्य केले. संचालन सुनील ठाकूर विषय साधन व्यक्ती, गसाके गोरेगाव तर आभार डी टी कावळे, विस्तार अधिकारी प. स. गोरेगाव यांनी मानले.

# गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणामुळे "या" जिल्ह्यांच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला मिळणार बळ

## • केंद्राकडून ४ हजार ८१८ कोटी निधीला मंजूरी • २४० कि.मी. लोहमार्गाचे होणार निर्माण



**गोंदिया :** गोंदिया,गडचिरोली व चंद्रपूर जिल्हे हे महाराष्ट्र राज्याच्या शेवटच्या टोकावरील जिल्हे असून पुर्वेकडे छत्तीसगड व उत्तरेकडे मध्यप्रदेश व दक्षिणेकडे तेलंगणा राज्याच्या सीमा या जिल्ह्यांना लागून आहेत तसेच. गोंदिया ते बल्लारशाह व चंद्रपुरकडे आंध्रप्रदेश राज्याची सीमा लागुन असल्यामुळे पुर्व विदर्भातील गोंदिया,गडचिरोली व चंद्रपूर जिल्हे व्यावसायिक दृष्टीकोनातून औद्योगिक वाटचालीसाठी महत्वपूर्ण जिल्हे आहेत.या जिल्ह्यांच्या सीमेतून गोंदिया-बल्लारशा रेल्वेमार्ग जात असून दुहेरीकरणाला हिरवी झेंडी मिळाली आहे.या दुहेरीकरणामुळे जिल्ह्यांच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला नवे बळ मिळणार आहे.सोबतच लहान मोठ्या सर्व रेल्वेस्थानकाचे अमृत भारत योजनेतंर्गत सुसज्जीकरण करण्यात येत आहे.तर वडसा येथून गडचिरोलीला रेल्वेमार्ग जोडला जाईल आणि औद्योगिक विकासाची क्रांती गडचिरोली जिल्ह्यात रेल्वेच्या माध्यमातून घडणार आहे.

आज (ता.११) दूरदृष्य आभासी परिषदेत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोंदिया ते बल्लारशाह रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणा संदर्भात पत्रकार परिषदेत मंजूर कामांबाबतची माहिती दिली.येत्या ५ वर्षात हे काम पुर्णत्वास येणार असून ४६९.४० हेक्टर जागेपैकी ४४४.२९२ हेक्टर जागा उपलब्ध आहे.तर वनविभागाकडून ११.२७ हेक्टर जागा या दुहेरीकरणाकरीता लागणार आहे.या मार्गावर १ मोठा पूल,३५ मध्यम पूल व ३३८ लहान पूल तयार करण्यात येणार आहेत. यावेळी दूरदृष्य आभासी प्रणालीद्वारे गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील, खासदार प्रफुल पटेल व जिल्ह्यातील चारही आमदार उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथून प्रभारी जिल्हाधिकारी एम. म ुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, रेल्वेचे उपमुख्य अभियंता इदरीस मोहम्मद,गडचिरोली येथून जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा,चंद्रपूर येथून आमदार सुधीर मुनगंटीवार,किशोर जोरगेवार व जिल्हाधिकारी प्रत्यक्षपणे उपस्थित होते.

सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ४ हजार ८१८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून गोंदिया ते बल्लारशाह या दरम्यान २४० कि.मी. नविन लोहम ार्गाचे निर्माण करण्यात येणार आहे. त्यामुळे दक्षिण भारताला जोडणारी ही महत्वपूर्ण परियोजना ठरणार आहे. तसेच वडसा ते गडचिरोली रेल्वे मार्गाला देखील मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील महत्वपूर्ण उत्पादन तांदूळ, गडचिरोली जिल्ह्यात विविध परियोजनांतर्गत पोलाद कारखाने व चंद्रपूर जिल्ह्यातील खनिज कोळशा विदर्भाच्या विकासासाठी मैलाचा दगड (चळश्रशींपश) ठरणार आहे. तसेच गोंदिया व गडचिरोली हे आदिवासी जिल्हे असून नैसर्गिकदृष्ट्या संपन्न असल्यामुळे येथील वनोपजाला बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

### तीन रेल्वे स्थानकांवर एक्स्प्रेस गाड्यांना थांबा द्या

गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गावरील सौंदड, अर्जुनी मोरगाव, ब्रम्हपुरी हे तीन महत्त्वपूर्ण रेल्वे स्थानक आहेत. या तिन्ही रेल्वे स्थानकांवरून मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करतात. पण, अद्यापही या स्थानकावर एक्स्प्रेस गाड्यांना थांबा नाही. त्यामुळे या स्थानकांवर एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा, अशी मागणी खा. प्रफुल्ल पटेल यांनी केली. तसेच, गोंदिया ते बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे आभार व्यक्त करून हे काम वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### पर्यटन व उद्योगाला चालना

गोंदिया ते बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणामुळे गोंदिया व भंडारा जिल्ह्या-तील पर्यटनाला चालना देण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. या भागात धानाचे सर्वाधिक उत्पादन घेतले जात असून, यामुळे या उद्योगाला सुद्धा चालना मिळण्यास मदत होणार आहे.

### अयोध्येला जोडण्याकरीता पुर्व विदर्भातील गोंदिया महत्वाचे रेल्वेस्थानक ठरणार

### राहण्याच्या जागेची चिंता नाही

- विशेष म्हणजे गोंदिया, जबलपूर मार्गावर प्रवाशांची संख्या जास्त आहे.
- दिल्लीहून नागपूर ते इटारसी मार्गावरही गाड्या धावतात. मालगाड्यांच्या वाहतुकीवरही मोठा ताण आहे.
- गोंदिया स्टेशन उत्तर भारताला दक्षिण भारताशी जोडणारा प्रवेशद्वार होऊ शकते.
- म्हणून, गोंदिया-बल्लारशाह रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण मंजूर करण्यात आले.

नागपूरहून अयोध्या मार्गे गोंदिया, जबलपूर अशी ट्रेन चालवण्याची शक्यता आहे. या मार्गावर प्रवासी आणि मालगाड्यांचा जास्त ताण नाही. आता विदर्भाला रामधामशी जोडण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी किती प्रयत्न करतील हे पाहणे बाकी आहे

### अंतर सारखे असले तरी, दीड तासाचा फरक

इटारसी मार्गे
नागपूर-इटारसी : २९८ किमी
इटारसी-जबलपूर : २४४ किमी
जबलपूर-प्रयागराज : ३५९ किमी
प्रयागराज-अयोध्या धाम: १६१ किमी
एकूण अंतर : १०६२ किमी एकूण वेळ : अंदाजे २० तास

### गोंदिया मार्गे

नागपूर-गोंदिया : १२७ किमी
गोंदिया-जबलपूर : ३६५ किमी
जबलपूर-प्रयागराज : ३५९ किमी
प्रयागराज-अयोध्या धाम: १६१ किमी
एकूण अंतर : १०६२ किमी एकूण वेळ : अंदाजे १८.३० तास

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा




**गोंदिया :** आरोग्य अभियानात १० वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित विविध पदावर समायोजन करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. दि. १४ मार्च २०२४ नुसार एकूण ७१ संवर्गातील कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचे ठरले होते. त्यानुसार दोन संवर्गातील ३१ कंत्राटी वाहन चालक, तर कंत्राटी सपोर्ट स्टाफ असे एकूण ३४४ जणांना वर्ग ४च्या पदावर सामावून घेण्याचे आदेश देण्यात आले. परंतु ६९ संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश दिले नाहीत. त्यासाठी दि. १६ व १७एप्रिल २०२५ रोजी एनएचएम कर्मचारी आंदोलन करणार आहेत. यासंदर्भात जि. प. मुख्यकार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांना निवेदन दिले.शिष्टमंडळात यांचा समावेश पवन वासनिक, स्वप्नाली ठवकर, संजय बिसेन, अमित मंडल, डॉ. मीना वट्टी, अर्चना वानखेडे, संतोष बोरकर, अनिल रहमतकर, अविनाश वन्हाडे, बबिता रहांगडाले, डॉ. योगेश पटले, निशांत बन्सोड, विद्या रहांगडाले, कल्याणी चौधरी, भुमेश्वरी न्यायकरे व कर्मचारी यांचा समावेश होता.

शासनाने निवेदनाची दखल न घेतल्यास दि. १६ व १७ एप्रिल २०२५ रोजी धरणे आंदोलन व त्यानंतरही मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास २३ एप्रिलपासून बेमुदत उपोषण केले जाणार आहे. त्वरित वेतन सुसूत्रीकरण लागू करण्यात यावे, २ महिन्याचे थकित वेतन अदा करण्यात यावे, ३-६ महिन्यांचे थकीत दैनिक भत्ता व इंधन भत्ता देयक अदा करण्यात यावा, समान काम समान वेतन तत्काळ लागू करण्यात यावे, १० वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे विनाविलंब सेवा समायोजन करणे, सर्व कर्मचाऱ्यांना ईपीएफ योजना लागू करणे, सर्व कर्मचाऱ्यांना विमा सुरक्षा कवच लागू करणे, ३७ दिवसांचे वेतन आंदोलन कालावधीतच मंत्रालयीन बैठकी दरम्यान ठरल्याप्रमाणे तत्काळ अदा करणे, आंदोलन काळातील कर्मचाऱ्यांवर दाखल झालेले गुन्हे रद्द करण्यासाठी गृहविभागाकडे पत्र पाठविण्याचे ठरलेले होते. अजूनपर्यंत सार्वजनिक विभागाकडून पत्र गेलेले नसून तत्काळ गृहविभागाकडे गुन्हे रद्द करण्यासाठी पत्र पाठविण्यात यावे, अन्यायकारक बायोमेट्रिक हजेरी व फेस रिडिंगप्रणाली तत्काळ रद्द करणे या मागण्यांचा समावेश होता.

### गोंदियात पेंशन अद-ालतीचे आयोजन २२ एप्रिल रोजी

गोंदिया : जिल्हा कोषागार कार्यालय, गोंदिया यांच्या वतीने दि.२२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत कार्यशाळा तथा पेंशन अदाल-तीचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह, गोंदिया येथे आयोजित करण्यात आले आहे.

## काचेवानी रेल्वे उड्डाणपुलाचा प्रश्न त्वरित मार्गी लावा -आ.रहांगडाले

### रेल्वे अधिकाऱ्यांसह बांधकामाची केली पाहणी करुन दिले निर्देश

**तिरोडा :** राष्ट्रीय महामार्ग ७५३ चे काचेवानी येथे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. पण अद्यापही काचेवानी फाटकावर रेल्वे उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात आले नाही. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी कायम आहे. त्यामुळे हे काम युद्धपातळीवर करून रेल्वे उड्डाणपुलाचा प्रश्न त्वरित मार्गी लावण्याचे निर्देश आ. विजय रहांगडाले यांनी रेल्वे व संबंधित विभागांना दिले.

काचेवानी रेल्वे चौकीजवळ काही नागरिक वस्ती करून राहत असल्याने या पूल बांधकामाचा फटका या परिसरातील नागरी वसाहतीला बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे या पुलाची जागा बदलून मागील बाजूने बांधकाम करण्याबाबतची मागणी स्थानिकांनी आ. विजय रहांगडाले यांच्याकडे केली. त्यांनी याची दखल घेत शुक्रवारी (दि.११) या परिसराची अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

यावेळी अधीक्षक अभियंता, नरेश बोरकर, रेल्वे विभागाचे विभाग अभियंता अजय पाटील उपस्थित होते. आ. रहांगडाले यांनी चौकशी केली व तातडीने नागरिकांच्या मागणीनुसार पुलाची जागा लवकरात लवकर ठरवून उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू करण्याचे निर्देश दिले. यावेळी सरपंच जयश्री गुनेरिया व गावकरी उपस्थित होते.



## मराठा सेवा संघाच्या जिजाऊ रथयात्रेला प्रतिसाद



**नवेगावबांध :** जिजाऊ रथयात्रेचा २६ वा दिवस - मराठा समाजाच्या ऐक्य, सशक्तीकरण आणि राष्ट्र उभारणीच्या संकल्पनेतून मराठा सेवा संघाच्या माध्यमातून मजिजाऊ रथयात्रा २०२५फ अंतर्गत सुरू असलेले मराठा जोडो अभियान राज्यभरात मोठ्या उत्साहात पार पडत आहे. या उपक्रमाचा २६ वा दिवस १२ एप्रिल रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील धाबे टेकडी या गावात साजरा झाला. तिथून ही रथयात्रा मार्ग क्रमांक झरपड़ा अर्जुनी मोरगाव या ठिकाणी चौकात रथयात्रेचे स्वागत व मार्गदर्शन झाले नंतर या दिवशी रथयात्रेचे नवेगावबांध सीमेवर भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. यात्रा मार्गक्रमण करत शिवाजी चौकात दाखल झाली. शिवाजी चौक महिला संघटनेच्या वतीने पूजन व जिजाऊ वंदना घेऊन स्वागत करण्यात आले. रथ शिवाजी चौकात स्थिरावला आणि तिथेच २६ व्या दिवसाचे समापन झाले. नवेगावबांध येथे या मुक्कामी प्रेक्षकांसाठी मराजा शिवछत्रपतीफ या प्रेरणादायी महानाट्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. सुमारे ५,००० प्रेक्षकांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक नाट्यप्रयोगाचा आनंद घेतला. चोख पोलिस बंदोबस्त आणि शिस्तबद्ध व्यवस्थेमुळे कार्यक्रम अतिशय यशस्वी ठरला. या उपक्रमाचे आयोजन मराठा सेवा संघाचे जिल्हा प्रमुख सुनील तरोणे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. मराठी बाणा नवेगावबांध सेवा फाउंडेशन व सुनील तरोणे मित्रपरिवार यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत नेटका व प्रेरणादायी ठरला. १८ मार्च २०२५ रोजी भोसले गडी, वेरूळ (जि. छ. संभाजीनगर) येथून सुरू झालेली ही रथयात्रा १ मे २०२५ रोजी लाल महाल, पुणे येथे संपन्न होणार आहे. ४५ दिवस चालणाऱ्या या ऐतिहासिक यात्रेत राज्यातील बहुसंख्य जिल्ह्यांतून जनसंवाद, जनजागृती आणि सामाजिक ऐक्याचे संदेश पोहोचवले जात आहेत. या रथयात्रेचा उद्देश धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता, आर्थिक न्याय आणि राष्ट्र उभारणी या तत्त्वांचा प्रसार करणे हा आहे. समाजात निर्माण झालेला तणाव, असुरक्षितता आणि विभाजनाच्या वृत्तींना उत्तर देण्यासाठी संवाद, शहाणपणा आणि बंधुभाव या त्रिसूत्रीवर ही यात्रा मार्गक्रमण करत आहे. मएकीचे बळ हेच समाजाच्या उन्नतीचे पायाभूत तत्व आहे. चला, जिजाऊ रथयात्रेच्या माध्यमातून नव्या परिवर्तनाचा मार्ग प्रशस्त करूया,फ असा संदेश या रथयात्रेद्वारे दिला जात आहे.

### धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी सुविधा केंद्र

**गोंदिया :** गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या (रातूमनावि) सहकार्याने १५ एप्रिल रोजी विद्यार्थी सुविधा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले या केंद्राचे उद्घाटन स्वर्गीय मनोहर भाई पटेल आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पन व दीप प्रज्वलन करून आदरांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी गोंदिया एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा वर्षा पटेल, माजी आ. राजेंद्र जैन, जीईएसचे संचालक निखिल जैन, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. समय बन्सोड, डॉ. नीलकंठ लंजे, प्रथमेश फुलेकर, मनीष वंजारी, अ?ॅड. वसंत चुटे, प्राचार्य डॉ. अंजन नायडू तसेच कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. दिलीप चौधरी उपस्थित होते.महाविद्यालयाला विद्यार्थी सुविधा केंद्र दिल्याबद्दल नागपूर विद्यापीठाला धन्यवाद दिले. जीइएसच्या अध्यक्षा वर्षा पटेल यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्सा-हन देऊन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. संजय कवीश्वर अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विभाग यांनी आपले विचार व्यक्त करतांना विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र, त्यांच्या समस्या, नवीन योजनांची माहिती सांगितले त्यासाठी विविध ॲप आणण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले. डॉ. नीलकंठ लंजे सदस्य व्यवस्थापन परिषद यांनी हे सुविधा केंद्र सुरु करणे हा विद्यापीठाच्या उत्तम उपक्रम आहे असे म्हटले. यामुळे जे विद्यार्थी नागपूरपासून खूप लांब राहतात त्यांना केंद्रामुळे सुविधा होईल व त्यांच्या खर्च व वेळ वाचेल या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमांचे प्रमाणपत्र सहज उपलब्ध होऊ शकतात.

## देवरी सीमा तपासणी नाक्यावरील मोटार वाहन निरीक्षक, दोन खासगी इसमासह एसीबीच्या जाळ्यात

### सीमा तपासणी नाक्यावर खासगी व्यक्तींची नियुक्ती कुठल्या आधारावर केली ?



**गोंदिया :** ट्रक चालकाकडून पाचशे रुपयांची लाच स्वीकारताना देवरी येथील आरटीओ सीमा तपासणी नाक्यावर मोटारवाहन निरीक्षक व दोन खासगी व्यक्तीवर नाशिक येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि.११) कारवाई केली. या कारवाईनंतर नागपूर येथील हिशोब गोंदियात चुकता केल्याची चर्चा आहे.

नागपूर ग्रामीण येथील मोटार वाहन निरिक्षक योगेश गोविंद खैरनार(वय ४६) यांच्यासह खासगी इसम नरेंद्र मोहनलाल गडपायले(वय ६३ रा.मरारटोली,आझाद वार्ड,गोंदिया) व आश्लेष विनायक पाचपोर (वय ४५,खासगी ड्रायव्हर,शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजच्या समोर गाडगेबाबा मंदिराच्या मागे,गाडगेनगर अमरावती)यांच्याविरुध्द लाच स्विकारल्याप्रकरणी अटक करुन देवरी पो-लीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आले आहे.न्यायालयाने २५ एप्रिलपर्यत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

मोटारवाहन निरीक्षक योगेश खैरनार हे नागपूर जिल्ह्यातील कांद्री येथील सीमा तप-ासणी नाक्यावर कार्यरत असताना काही ट्रक चालकांवर त्यांनी कारवाई केली होती.यासंदर्भात ट्रक चालकांनी तक्रारसुद्धा केली होती; पण तेव्हा त्यांच्यावर कुठलीच कारवाई करण्यात आली नव्हती.तेव्हापासूनच एक ट्रक युनियन आणि खैरनार यांच्यात सुप्तपणे शीतयुद्ध सुरू होते. देवरी येथील आरटीओ सीमा तपासणी नाक्यावर मोटारवाहन निरीक्षक खैरनार हे गेल्या आठ- दहा दिवसांपासून कार्यरत होते. हीच संधी साधत एका ट्रक युनियनने नाशिक येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे याची तक्रार केल्यानेच ही कारवाई झाल्याची माहिती आहे.

या तक्रारीच्या आधारावर सापळा रचून शुक्रवारी दोन खासगी व्यक्तींच्या माध्यमातून लाचेची मागणी करून ती स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पकडले. पहाटे चार वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर नागपूरचा हिशोब गोंदियात चुकता केल्याची चर्चा देवरी आरटीओ सीमा तपासणी नाक्यावर होती.

### कारवाईनंतर सीमा तपासणी नाक्यावर सामसूम

थेट नाशिक येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शुक्रवारी पहाटे पाचशे रुपयांची लाच स्वीकारताना मोटारवाहन निरीक्षक व दोन खासगी व्यक्तींवर कारवाई केली. या कारवाईनंतर या सीमा तपासणी नाक्यावर कार्यरत असलेले इतर खासगी व्यक्तीसुद्धा गायब झाले होते, तर नाक्यावर दिवसभर सामसूम होती.

### बऱ्याच दिवसांपासून होती चर्चा

महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेजवळील शिरपूर गावाजवळ देवरी आरटीओ चेकपोस्टवर दोन्ही राज्यांतून येणाऱ्या वाहनांची तपासणी केली जाते. या सीमा तपासणी नाक्यावर बराच सावळा गोंधळ सुरू असल्याची चर्चा अनेक दिवसांपासून होती. तपासाच्या नावाखाली ट्रक चालकांना चालान देऊन त्यांच्याकडून अवैध वसुली केली जात असल्याची चर्चा आहे. ती चर्चा शुक्रवारी झालेल्या कारवाईनंतर खरी ठरली.

## चालते फिरते पासपोर्ट सेवा केंद्र उपक्रम चांगला - पंकज रहांगडाले



**गोंदिया :** मशासन आपल्या दारीफ या उपक्रमांतर्गत मपासपोर्ट सेवा केंद्र आपल्या दारीफ उपक्रम राबविला जाणार आहे. ११ एप्रिल रोजी गोंदिया मुख्य पोस्ट ऑफिस येथे एक दिवसीय पासपोर्ट सेवा मोबाइल शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी माजी जि. प. अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी उपक्रमाचे स्वागत करत जिल्ह्यातील नागरिकांसाठी हा उपक्रम अतिशय चांगला असल्याचे सांगितले. या शिबिरात नवीन पासपोर्ट तसेच पासप-ोर्ट नूतनीकरणाचे (रिन्यूअलचे) काम करण्यात येणार असून, सर्व नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंकज रहांगडाले यांनी नागरिकांना केले. उत्कृष्ट प्रतिसाद मिळाल्यास कॅम्प आठवड्यातून तीन दिवस आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.यावेळी सामाजिक कार्यकर्ते विनोद गुड्डू चांदवाणी, पुरू ठाकरे, गोल्डी गावंडे, फणिंद्र पटले, आणि विलाश गौतम उपस्थित होते.

### नागरिकांची पायपीट कमी